गांवकरी. सोम. दि. ०८/०६/२००९

# निवडलेल्या क्षेत्राकडेच विद्यार्थ्यांनी अधिक लक्ष द्यावे: प्रा. नवले

नाशिक (वार्ताहर):- अभियांत्रिकी क्षेत्रातही ३० पेक्षा अधिक पर्याय आहेत. नाशिकमध्ये त्यापैकी १० शाखांचे पर्याय उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी कोणत्या प्रकाराला जास्त मागणी आहे याचा विचार करण्यापेक्षा निवडलेल्या क्षेत्रात आपण किती श्रेष्ठ काम करू शकतो हे लक्षात घ्यायला हवे, असे प्रतिपादन प्रा. विजय नवले यांनी केले.

'एम पॉवर'तर्फे काल प.सा. नाट्यगृहात प्रा. विजय नवले यांचे अभियांत्रिकी प्रदेश या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रारंभी रघुनाथ जोगळेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

प्रा. नवले म्हणाले, अभियांत्रिकी अभ्यासक यांची प्रवेशप्रक्रिया दि. १४ जूनपासून सुरू होईल. ती समजावून घेतली पाहिजे. विद्यार्थ्यांनी फक्त माहिती तंत्रज्ञानाच्या शाखांमागे न लागता इतरही क्षेत्राचा विचार करायला हवा. तेथेही तांत्रिक बळाची व ज्ञानाची गरज लागते. सीईटी परीक्षेतील गुणांनुसार महाविद्यालयाची निवड केलीत तर अपेक्षाभंगाचे दु:ख वाट्याला येणार नाही. वेळ, पैसा यांची बचत होऊन पाल्य व पालकांची होणारी फरफट टाळता येईल, असे नवले यांनी नमूद केले.

दकश्राव्य माध्यमासह विषय विस्ताराने सांगून विद्यार्थी व पालकांच्या शंकांचे निरसन प्रा. नवले यांनी केले. अभियांत्रिकी शिक्षण घेतल्यावर देशाच्या प्रगतीत अभियंत्यांनी योगदान दिले पाहिजे. भारताच्या विकासात आपला खारीचा वाटा जर सक्षमपणे उचलला तर देश जगाच्या सर्वोच्चस्थानी पोहचवण्यास हातभार लागेल, असेही त्यांनी सांगितले. ॲड. मिलिंद चिंधडे यांच्या हस्ते प्रा. नवले यांचा सत्कार करण्यात आला. महेश नरके यांनी आभार मानले. व्याख्यानाला मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते. यशश्री क्लासेसचे प्रा. दीपक गोखले व प्रा. रवींद्र जोगळेकर यांनी हा कार्यक्रम प्रायोजित केला.

लोकमत. सोम. दि. ०८/०६/२००९



# अभियांत्रिकी शाखेच्या माध्यमातून करिअरचे जागतिक दालन खुले : नवले

**नाशिक, दि. ७ (प्रतिनिधी)** - अभियांत्रिकी शाखेच्या माध्यमातून करिअरचे जागतिक दालन खुले झाले आहे, असे प्रतिपादन प्रा. विजय नवले यांनी केले.

प. सा. नाट्यगृहात सेवाभावी समाजकल्याण संस्था, यशश्री क्लासेस व एम पॉवर यांच्या वतीने 'अभियंता करिअर व प्रवेशप्रक्रिया' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, अभियांत्रिकी शाखेत प्रवेश घेणाऱ्यांना करिअरची मोठी संधी उपलब्ध असून, जागतिक मंदीमुळे निराश न होतां आपली आवड, क्षमता व पात्रता ओळखून शाखा निवडावी. सामायिक प्रवेश परीक्षेचा येत्या १४ जून रोजी निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांची धावपळ होते. त्यामुळे बऱ्याचदा घाईगर्दीत चुकीचा निर्णय घेतला जातो. त्यामुळे आपल्याला कोणत्या शाखेत प्रवेश घ्यायचा आहे याविषयी आतापासूनच निर्णय घेणे गरजेचे आहे. यावेळी सेवाभावी संस्थेचे जोगळेकर, एम पॉवरचे महेश नरके व यशश्री क्लासचे संचालक दीपक गोखले उपस्थित होते.